## कसदार कथालेखक : श्री. दा. पानवलकर

वामन काळे

श्री.दा. पानवलकर हे, जबरदस्त सामर्थ्यशाली कथालेखक म्हणून आपलं नाव मराठी साहित्यात चिरमुद्रित करणारे साहित्यिक. पारदर्शक प्रतिभा, प्रत्ययकारी उपमा, संवेदनाशील सूचकता, आणि गोठवणारे शब्दसामर्थ्य, अशा आशयानुरूप कलात्मक शैलीने,त्यांच्या कथांचा घाट चिरेबंदी इमारतीसारखा घट्ट विणलेला होता. श्री.दा. सांगलीचे. १३ फेब्रुवारी १९२८ रोजी त्यांचा जन्म झाला. नगरपालिका मराठी शाळा क्र. २ मधून, प्राथमिक शिक्षण झाले आणि सिटी हायस्कूलमध्ये मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण झाले. सिटी हायस्कूल च्या दीक्षित गुरुजींनी नाना शंकरशेट शिष्यवृत्तीचे उज्ज्वल परंपरा निर्माण केली होती. त्यासाठी पानवलकरांची त्यांनी तयारी केली होती. त्यांना दुसऱ्या क्रमांकाची अकबर नवीस शिष्यवृत्ती मिळाली. या अभ्यासाची गाढ आणि प्रचुर छाया त्यांच्या भाषाशैलीवर पडलेली आढळते. त्यांच्या काही कथावस्तूंचा संबंधही या अध्ययनाशी पोचतो.

'सूर्य' ही त्यांची अत्यंत गाजलेली कथा या कथेत तत्कालीन ७० वर्षापूर्वीच्या सांगलीचा इतिहास भूगोल आणि संस्कृती यांचे जिवंत दर्शन घडते. लहानपणातले संस्कारसंपन्न जीवन आणि पुढे एकाकी जीवनातून आलेला बेभानपणा, अशा आंतरिक संघर्षातून, त्यांच्या कथानिर्मितीच्या आव्हानातून, त्यांचं अवघं लेखन झालेलं आहे.
कस्टमखात्यातील नोकरीच्या अनुभवातून, पाोलिस, कस्टमवाले, बेरड, मवाली, दरोडेखोर, क्रिमिनल्स यांचे जग, त्यांच्या कथांतून क्रियावान झाले आहे. परिस्थितीशी टक्कर देताना ही माणसे वैतागतात, कडवत बनतात, हतबल होतात. फुटतात, पण मरगळून जात नाहीत. या माणसांतील माणसांचा अंतर्बाह्य शोध घेताना त्यांच्या कथातील, मनांची सूक्ष्म आंदोलने, घारीच्या डोळ्यातून केलेली निरीक्षणे, नाट्य, आणि आशयाला अनुरूप दमदार भाषेमुळे, कथा वाचताना वाचक सुन्न होतो.

आशय आणि आविष्काराची विविधता हे पानवलकरांच्या कथांचे निर्णायक सामर्थ्य. 'आडवा बोळ' या कथेपासून हुंकारपर्यंतचा हा प्रवास मराठी कथाविश्वात मननीय आहे. शुध्दघटना प्रधानकथा, भावकथा, मनोविश्लेषणात्मक कथा, रहस्यमय आणि चिरतत्त्वस्पर्षी कथा, अशी या कथांची वर्गवारी करणे कदाचित अन्यायाचे होईल. त्यांच्या कथेने केलेला प्रवास हा त्यांचाच आंतरिक प्रवास होता आणि तो कथेच्या माध्यमातून घडावा असा त्यांचा ध्यास होता. 'हुंकार' या त्यांच्या अखेरच्या काळातील महत्त्वाच्या कथेत त्यांच्या आयुष्यभराचे चिंतन प्रकट होते. ते असे – ''राघव, भद्र–अभद्र असं काही उभ्या जन्मात नसतं. कापुराला आग लागली म्हणजे कापूर जळून जातो. आग उरत नाही. काजळ म्हणशील तर तेही दिसत नाही. उभयातील उरतं मात्र आकाशसदृश अणुपरमाणूचं घनदाट आस्तित्व. सगळी सृष्टी त्याच्याशी संवाद करते. सुखदुःखाचा निरास तिथे होतो. साऱ्या वस्तुमात्राची झेप तिकडं. विश्वाचं प्रतिबिंब तिथं उतरत. जे घडतं ते अभद्र नसतं. सतत घडत रहाणं ही स्थितिगती. ती भद्रच असते असं नाही. काही न उरणं व सतत घडत रहाणं हा सृष्टीचा अनंत नियम...'

'गजरा', 'औदुंबर', 'सूर्य', 'एका नृत्याचा जन्म', 'चिनाब' आणि 'जांभूळ' हे त्यांचे कथासंग्रह. हे सर्व संग्रह मौज प्रकाशनचे आहेत. आपले उत्तम लेखन मौजेने प्रकाशित करावे, असा पानवलकरांचा कटाक्ष असे. यापैकी 'औदुंबर', 'सूर्य' आणि 'चिनाब' या संग्रहांना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार प्राप्त झाले. सूर्य या कथेला प्रथम अभिरुची कथास्पर्धेत प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला. नंतर या कथेवर 'अर्धसत्य' हा हिंदी चित्रपट निघाला. तो खूप गाजला. या चित्रपटासाठी, कथा लेखकाचं फिल्मफेअर पारितोषिक पानवलकरांना मिळालं. 'अग्निस्पर्श' या त्यांच्या कथेला, सारिका या तत्कालीन कथांच्या हिंदी नियतकालिकाच्या सर्वभाषा कथास्पर्धेत पारितोषिक मिळाले होते. कधीकधी

एकांकिका, नाटक, ललितलेख असेही लेखन त्यांनी केले असले तरी मराठी रसिक त्यांना ओळखतात ते कथालेखक म्हणूनच. 'सूर्य' या कथेवरील 'अर्धसत्य' या गाजलेल्या चित्रपटाच्या पहिल्या दिवसापासून शेवटपर्यंत संपूर्ण चित्रीकरणाला पानवलकर चिकाटीने उपस्थित राहून त्यांनी या चित्रीकरणाची दैनंदिनी लिहिली. 'शूटिंग' या शीर्षकाने ती पुस्तकरूपात प्रकाशित झाली. या दैनंदिनीला पानवलकरांची आत्मीयता आहेच, पण भरपूर कल्पक आणि कलात्मक, अर्थपूर्ण छायाचित्रांमुळे या दृष्यप्रधान चित्रपट माध्यमावरील त्यांच्या या पुस्तकाला पानवलकरांच्या चित्रदर्शी लेखणीची धार आणि तळपट्टी लाभली आहे. एखाद्या चित्रपटाचे चित्रिकरण, अर्थापासून इति पर्यंत, तशीलवार नोंदणारे असे पुस्तक मराठीत तर नाहीच, पण इतर अनेक भारतीय भाषामध्येही या दर्जाचे पुस्तक प्रकाशित झालेले नाही. कलावंत आणि तंत्रज्ञ यांच्यापासून, चित्रपट आणि साहित्य या दोहोंच्या रसिकापर्यंत सर्वांनाच हे पुस्तक वेधक वाटते. हे पुस्तक प्रसिध्द होण्यापूर्वीच १९ ऑगस्ट १९८५ रोजी, सांगली या आपल्या जन्मगावीच श्री. दा. पानवलकर दिवंगत झाले.

*